क्र.मासं /रवका/ न.क्र ८८७/ 36311
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : edhr_dist@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

दिनांक : 12 OCT 2015

# परिपत्रक

विषय : माहितीचा अधिकार अधिनियम - २००५ अंतर्गत कंपनीच्या कार्यालयीन परीक्षांविषयक माहिती देण्याकरीता मार्गदर्शक सूचना.

.....

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींची अंमलबजावणी कारण्याबाबतच्या सूचना यापुर्वी वेळोवेळी देण्यात आलेल्या आहेत. सदर सूचनांमध्ये माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही कशाप्रकारे/किती दिवसांत करण्यात यावी, अपिलीय अर्ज कसे निकाली काढावे, तसेच अधिनियमांतील इतर तरतुदींची सविस्तर माहिती व एकापेक्षा जास्त प्राधिकरणाशी संबधीत असलेल्या अर्जांवर कशी कार्यवाही करावी हे समाविष्ट करण्यात आले आहे.

२. तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींनूसार अर्जदारास उपलब्ध असलेली माहिती पुरविणे बंधनकारक असून अधिनियमातील कलम ७ अंतर्गत कोणत्या परिस्थितीत माहिती नाकारता येते याबाबत स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला आहे. या अनुषंगाने कंपनीतील परिक्षा विभागातील गोपनीय दस्तऐवजांबाबत माहिती अधिकारा अंतर्गत करावयाच्या कार्यवाहीकरिता खालील मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करावा.

क) संबधित परीक्षेपूर्वी कोणालाही प्रश्नपत्रिका पुरविता येणार नाही व परिक्षा सुरू असतांना संबंधित विषयांच्या परिक्षार्थ्याखेरीज अन्य कोणालाही प्रश्नपत्रिका देता येणार नाही.

ख) प्रश्नपत्रिका संपादन करणारे प्रश्निक व भाषांतरकाराची नावे तसेच यांचे पत्ते देता येणार नाही.

ग) परिक्षा केंद्रावर नियुक्त केलेली परिक्षक तसेच गोपनीय कामासाठी नियुक्त कर्मचारी यांची नावे व पत्ते देता येणार नाही.

घ) परिक्षा केंद्रावरील केंद्रसंचालक , पर्यवेक्षक व अन्य कर्मचा-यांची नावे व पत्ते याबददल माहिती देता येणार नाही.

च) विविध विषयांचे परिक्षक, नियामक व मुख्य नियामकांची नावे व पत्ते याबददल माहिती देता येणार नाही.

छ) इतर परिक्षार्थीच्या उत्तरपत्रिका, उत्तरपत्रिकेचे मुख्यपृष्ठ अथवा उत्तरपत्रिकांची छायाप्रत देता येणार नाही.

ज) परिक्षार्थीच्या उत्तरपत्रिका तसेच त्यामधील गुणांचा तपशील याबाबतची माहिती संबधित परिक्षार्थी व्यतिरिक्त अन्य व्यक्तीस देता येणार नाही.

झ) गुणपडताळणी करण्यासाठी नियुक्त केलेल्या गुणपडताळणी अधिका-यांची नावे व पत्ते देता येणार नाही.

ट) उत्तरपत्रिका, पुरवणी उत्तरपत्रिका, प्रश्नपत्रिका नेस्तनाबूत करणा-या मुद्रणालयाची माहिती देता येणार नाही.

ठ) उत्तरपत्रिका व पुरवणी उत्तरपत्रिकांच्या छपाईचे मुद्रणालय, वाहतूकदार व परीक्षा केंद्रावरील वितरण व्यवस्थेची माहिती देता येणार नाही.

ड) परीक्षेच्या प्रश्नपत्रिका छपाईचे मुद्रणालय, प्रश्नपत्रिका वाहतुकीचे मार्ग, प्रश्नपत्रिकांचा साठा व वितरण याबद्दलच्या कार्यपदधतीची माहिती देता येणार नाही.

ढ) विभागात कार्यरत असलेल्या कर्मचारी व अधिका-यांच्या निवासस्थानाचा पत्ता देण्याची बाब कार्यालय प्रमुखांच्या स्वेच्छा निर्णयांवर व मागणी संदर्भातील गुणवत्तेवर अवलंबून राहील.

३. सर्व संबधित अधिकारी / कर्मचारी यांनी उपरोक्त सूचनांचे अवलोकन करून त्यांची अंमलबजावणी होईल याबाबत दक्षता घ्यावी.

४. सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

12.10.15

**(नीलेश र. गटणे)**
कार्यकारी संचालक (मासं)

D:/O&M/Cir.F.N.887-RTI.doc
03.10.2015